# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र. १८८** **दिनांक १०/०७/२०२१**

## घरामध्ये चालणा-या जुगार आड्डयावर छापा टाकुन कारवाई -अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी

दिनांक १०.०७.२०२१ रोजी रात्रौ १७.०० वा. सुमारास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाला गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, 'बी/५०१, चैतन्य अरुणोदय हाईट, डॉन बास्को रोड, मिरागाव, काशिमीरा येथे राहते घरामध्ये जुगार चालु आहे'. मिळालेली माहिती वरिष्ठांना देवुन, झडती वॉरन्ट प्राप्त करुन पोलीस पथकाने पंचासह १९.२५ वा. सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला असता घरामध्ये १० स्त्री/पुरुष पैसे लावुन तीन पत्याचा जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले तसेच त्यांचे कब्जात ५२ पत्यांच्या पानाचे तीन कॅट, प्लॅस्टीकचे काळया रंगाचे चार बॉक्स त्यामध्ये १० कॅट, स्टीलचा डब्बा व रोख रक्कम ३४,४३०/- रु. मिळुन आल्याने पंचानामा करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत पोहवा/२२६९ उमेश हरी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र ४८०/२०२१, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४,५ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोहवा/२२६९ उमेश पाटील, पोहवा/२२९८ विजय निलंगे, पोहवा/१६३ रामचंद्र पाटील, मपोना/१७८९ वैष्णवी यंबर, मपोना/२८४५ कमल चव्हाण, काशिमिरा पोलीस ठाण्याचे पोउपनिरी श्री. मुल्ला, पोना/१५७४ जरग, पोशि/५८८ राकडे यांनी केली आहे.

----oooo----